**रे. दि. मु. क्रमांक ४८/२०२३ मधील नि.क्र. २४ खालील आदेश.**
**संजय पवार व इतर -विरुध्द- दत्तात्रय पवार व इतर**
**आदेश पारित दिनांक ०५.०१.२०२४**

---

प्रस्तूतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ ते ७ यांनी प्रस्तूत दाव्यात कैफियत व म्हणणे दाखल करण्यास झालेला ५१ दिवसांचा उशीर माफ करणेसाठी दाखल केलेला आहे. सदर अर्जासोबत प्रतिवादी क्र. १ नामे दत्तात्रय इंद्रजीत पवार यांचे सत्यप्रतिज्ञापत्र निशाणी क्र. २५ वर दाखल केले आहे.

**०२.** अर्ज वाचला. वादीने दाखल केलेल्या म्हणण्याचे अवलोकन केले. दोन्ही बाजूंच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तूत अर्जात प्रतिवादी क्र. १ ते ७ यांनी कथन केले आहे की, सदर प्रतिवादी यांना आवश्यक कागदपत्रे प्राप्त न झाल्याने त्यांना कैफियत व म्हणणे देणेकामी ५१ दिवसांचा विलंब झालेला आहे. तो विलंब माफ होणेकामी सदर प्रतिवादींनी प्रस्तूत अर्ज दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. १ ते ७ यांच्या विधिज्ञांनी ५१ दिवसांचा विलंब माफ व्हावा, ही विनंती केली आहे.

**०३.** वादीचे विधिज्ञांनी अर्जात प्रतिवादींनी मुदतीत कैफियत दिलेली नाही, हे लेखी म्हणणे मांडले आहे. तसेच प्रतिवादी यांना योग्य ती कॉस्ट करणेत यावी व प्रतिवादी यांचा विलंब माफीचा अर्ज फेटाळण्यात यावा, हे लेखी म्हणणे दाखल केले आहे आणि त्याच अनुषंगाने युक्तीवाद केला आहे.

**०४.** प्रस्तूत अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादींना त्यांची कैफियत अभिलेखावर दाखल करणे आवश्यक आहे. त्यांची कैफियत व म्हणणे दाखल करण्यास एकूण ५१ दिवसांचा विलंब झाला. प्रस्तूत दाव्याचा गुणदोषावर न्यायनिर्णय होणेकरिता प्रतिवादींची कैफियत अभिलेखावर असणे आवश्यक आहे. प्रतिवादींनी विहित वेळेत त्यांची कैफियत अभिलेखावर दाखल केली नसल्याचे हे कारण नमूद केले आहे की, सदर प्रतिवादी यांना आवश्यक कागदपत्रे प्राप्त न झाल्याने मे. कोर्टात येवून कैफियत व कागदपत्रे दाखल करणे शक्य झाले नाही.

**०५.** प्रतिवादी क्र. १ ते ७ यांचे विहित वेळेत कैफियत व म्हणणे दाखल न करण्याचे त्यांनी दर्शविलेले कारण संयुक्तीक आहे. त्यामुळे त्यांना कैफियत व म्हणणे दाखल करण्यासाठी

झालेला विलंब माफ करणे आणि त्यांची कैफियत अभिलेखावर दाखल होवून त्यांची बाजू ऐकणे हे न्यायोचित आहे. त्यामुळे प्रस्तूत अर्ज पुढीलप्रमाणे प्रतिवादी क्र. १ ते ७ यांना रुपये १००/- कॉस्ट भरण्याचे आदेश करून मंजूर करण्यात येत आहे. तरी खालील आदेश पारित करत आहे.

**आदेश**

| | |
|---|---|
| १. | प्रतिवादी क्र. १ ते ७ यांचा निशाणी क्र. २४ चा अर्ज रक्कम रुपये १००/- (अक्षरी रक्कम रुपये शंभर फक्त) इतक्या कॉस्टच्या आकारणीवर मंजूर करण्यात येतो. सदर कॉस्टची रक्कम तालुका विधी सेवा समिती, खंडाळा येथे जमा करावी. |
| २. | प्रतिवादी क्र. १ ते ७ यांना त्यांची कैफियत मुदतीत अभिलेखावर घेण्यास झालेला ५१ दिवसांचा विलंब माफ करण्यात येतो. |
| ३. | सदर आदेशाची दोन्ही पक्षकारांनी नोंद घ्यावी. |

स्वाक्षरीत/-
(अ. क. दामटे)
दिनांकः- ०५.०१.२०२४
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, खंडाळा.